Peer Reviewed and Refereed Journal

ISSN (Online) 2583-181X

# International Journal of Humanities, Social Science, Business Management & Commerce (IJHSSBMC)

A Quarterly International Research Journal of Humanities, Social Science, Business Management & Commerce

SRJIF Impact Factor (2024): 8.5

Volume 8, Issue 3 (September 2024)

**Editor-in-Chief**

Dhananjay Channale

**Guest Editors**

Prof. Maruf Mujawar

Prof. Dr. Arun Shinde

Infinity Academic & Research Association, Chatrapati Sambhajinagar (MS) INDIA

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 38 | बेघर स्त्रियांच्या समस्येचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>- प्रा. स्वाती शाहू परीट | 189 – 191 |
| 39 | करवीर तालुक्यातील खाजगी आणि शासकीय नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्यामधील मधील आक्रमकतेचा अभ्यास<br>- प्रा. सुनिल दगडू गोते | 192 – 197 |
| 40 | कोल्हापूर जिल्ह्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्यातील मानसिक आरोग्याचा अभ्यास<br>- कु. संजना श्रीनिवास सोनटक्के | 198 – 204 |
| 41 | **The study of Teaching Methods used by English Teachers at Secondary and Higher Secondary Level in Kolhapur District, Maharashtra**<br>- Mr. Sachin Namdev Chavan | 205 – 208 |
| 42 | हमीदुल्ला के नाटकों में चित्रित सामाजिक सद्भाव<br>- डॉ. उत्तम राजाराम आळतेकर | 209 – 211 |
| 43 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मानवतावादी दृष्टीकोन<br>- प्रा. डॉ. संध्या जयसिंग माने | 212 – 216 |
| 44 | तेंडुलकरांच्या नाटकांतून प्रकटणाऱ्या स्त्री-समस्या<br>- सई भूषण प्रभु | 217 – 222 |
| 45 | **Understanding Motivational Factors in Children's Participation in An Art Class: Implications for Educators**<br>- Dr. Anup M. Mule, Dr. Archana E. Mankar, and Mr. Jagdish Sardesai | 223 – 227 |
| 46 | **Individualism in the Novels of Chetan Bhagat**<br>- Professor Tulshikatti D. C. | 228 – 230 |
| 47 | दलित साहित्य में अभिव्यक्त सामाजिक सद्भावना<br>- प्रा. किरण सदानंद भोसले | 231 – 234 |
| 48 | जागतिकिकरण व मराठी ग्रामीण कादंबरी:एक दृष्टीक्षेप<br>- डॉ. सुशिलेंद्र दिनकर मांजर्डेकर | 235 – 240 |
| 49 | **Environmental Harmony in Kishwar Desai's The Sea of Innocence**<br>- S. D. Rajratna | 241 – 246 |
| 50 | **Spatio-Temporal Study of Changing Population Size from The Year 1991 To 2011: A Case Study of Karad Tehsil**<br>- Mr. K.I. Mulani, Mr. Y.A. Mane, Mr. D.A. Janawade, and Dr. S.S. Mane | 247 – 252 |


Scanned with OKEN Scanner

Open Access

International Journal of Humanities, Social Science, Business Management & Commerce
(An International Peer-reviewed & Refereed Scholarly Open Access Journal)
ISSN (Online): 2583-181X
Journal homepage: https://ijhsbc.iar-a.com/
Vol. 08, Issue 03, September 2024; Pages 189 – 191
DOI: 10.5281/zenodo.14546174
SRJIF Impact Factor (2024): 8.2

IJHSSBMC
ISSN (online) : 2583-181X

Original Research Article

# बेघर स्त्रियांच्या समस्येचा समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. स्वाती शाहू परीट**

समाजशास्त्र विभाग, चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी जि. कोल्हापुर ४१६२०३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail:* swatiparit100@gmail.com

Received: 25 July, 2024 | Accepted: 06 September, 2024 | Published: 07 September, 2024

**गोषवारा**

सदर शोधनिबंधामध्ये बेघर स्त्रियांच्या समस्येचा अभ्यास करण्यात आला आहे. बेघर स्त्रियांच्या समस्येचा अभ्यास करत असताना बेघर स्त्रियांच्या समस्या जाणून घेणे, त्या समस्येमागील कारणांचा अभ्यास करणे तसेच त्या समस्येचे समाजावर होणारे परिणामांचे अध्ययन करण्यात आले आहे. सदर समस्येचे अध्ययन करत असताना गुणात्मक संशोधन पद्धत तसेच वर्णनात्मक संशोधन पद्धतीद्वारे तथ्य संकलनाच्या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला आहे. बेघर स्त्रियांच्या समस्येच्या अध्ययनातून असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की, समाजामध्ये बेघर स्त्रियांचे प्रमाण खूप वाढले आहे. त्याचबरोबर त्यांना समाजामध्ये जीवन जगत असताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. त्यांचे जीवन अत्यंत संघर्षमय अशा स्वरूपाचे बनलेले दिसत आहे. त्यासाठी शासनाने विविध योजनांची निर्मिती केली आहे. त्या योजनांची समाजामध्ये अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

**मुख्य शब्द:** बेघरपणा, गरिबी, हिंसाचार, लिंग असमानता.

**प्रस्तावना**

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या तीन मूलभूत गरजा आहेत. या तीनही गरजा परस्परसंबंधीत आहेत. त्यातील निवारा ही गरज अत्यंत महत्त्वपूर्ण समजली जाते. कारण इतर दोन गरजा निवारा या तिसऱ्या गरजेवर अवलंबून आहेत. त्यामुळे त्या गरजेची जेव्हा समाजामध्ये कमतरता भासते, तेव्हा समाजामध्ये एक समस्या निर्माण होते. त्या समस्येला 'बेघर होणे' किंवा 'बेघरपणा' असे संबोधले जाते. ही समस्या समाजामध्ये निर्माण होत असताना समाजातील अनेक घटकांवर त्याचा विपरीत परिणाम होत असताना आपल्याला दिसून येते. या एका समस्येतून अनेक समस्यांची समाजामध्ये निर्मिती होत असते. त्यामध्ये स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये गरिबी, बेरोजगारी, निरक्षरता, हिंसाचार, लिंग असमानता. सामाजिक वंचितता इत्यादी समस्यांचा समावेश केला जातो. समाजातील या समस्यांचे निराकरण करणे गरजेचे आहे. त्यासाठी समाजातील बेघर स्त्रियांच्या समस्या जाणून घेणे, त्या समस्येमागील कारणांचा आढावा घेणे गरजेचे आहे.

### संदर्भ साहित्याचा आढावा

समाजातील कोणत्याही समस्येचे अध्ययन करत असताना मागील संशोधनाचा आढावा घेणे गरजेचे असते. त्यामुळे संशोधनास योग्य ती दिशा प्राप्त होते. त्यामुळे बेघर स्त्रियांच्या समस्या जाणून घेत असताना त्या समस्ये संदर्भात झालेल्या अभ्यासाचा आढावा घेणे गरजेचे आहे. जून (२००९) मध्ये कॅनडा येथील 'University of Calgary, Alberta' या विद्यापीठातून प्रकाशित करण्यात आलेल्या संशोधन लेखामध्ये घराच्या वैशिष्ट्यांचा शोध घेवून बेघर स्त्रियांच्या घराविषयीच्या संकल्पना जाणून घेवून त्यांच्या गरजांवर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच मार्च (२०१४) मध्ये Housing and Land Rights Network या नवी दिल्ली येथील [illegible] संस्थेमध्ये सदर करण्यात आलेल्या शोध निबंधामध्ये बेघरपणाची करणे, वैशिष्ट्ये आणि त्या समस्येमधील स्त्रियांना भेदभावाच्या विविध स्वरूप अधोरेखित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### संशोधनाची उद्दीष्ट्ये

१) समाजातील बेघर स्त्रियांच्या समस्या जाणून घेणे.

२) बेघर स्त्रियांच्या समस्येमागील कारणे आणि परिणामांचा आढावा घेणे.

### संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये गुणात्मक संशोधन पद्धती तसेच वर्णनात्मक संशोधन पद्धतीद्वारे अध्ययन करण्यात आले आहे. सदर समस्येचे अध्ययन करत असताना तथ्य संकलनाच्या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. त्यामध्ये संशोधन लेख, शोधनिबंध तसेच इंटरनेट वरील उपलब्ध असणाऱ्या माहितीचा समावेश करण्यात आला आहे.

### समाजातील बेघर स्त्रियांची समस्या

बेघर लोकसंख्येमध्ये प्रामुख्याने एकल पुरूष, स्त्रिया, वृद्ध, अपंग तसेच अनाथ बालके यांचा समावेश केला जातो. यातील कोणतीही व्यक्ती ही जन्मतः बेघर नसते. त्यांच्या बेघर होण्यासाठी काही कारणे जबाबदार असतात किंवा एखाद्या कठीण परिस्थितीमुळे त्यांना बेघर व्हावे लागते. त्यामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. एकदा घरातून बाहेर पडल्यानंतर एखाद्या व्यक्तीला बऱ्याच समस्या या नव्याने निर्माण होत असतात. तेव्हा त्या व्यक्तीच्या मनामध्ये अनेक प्रश्न निर्माण होतात पण दुर्दैवाने त्या प्रश्नांची उत्तरे त्या व्यक्तीला मिळू शकत नाहीत. त्यामुळे त्या व्यक्तीला नैराश्याला सामोरे जावे लागते. त्या व्यक्तीची मानसिकता दिवसेंदिवस बदलत जाते. त्याचा परिणाम म्हणून ती व्यक्ती अखेर मनोरुग्ण बनते. भिक मागणे आणि रस्त्यावर किंवा मंदिरात राहणे याखेरीज त्या व्यक्तीकडे दुसरा उपाय नसतो. त्यामुळे त्यांची सामाजिक, आर्थिक तसेच मानसिक स्थिती ही खूप दयनीय असल्याचे दिसून येते. यामध्ये पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना मोठ्या प्रमाणात समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे स्त्रियांचे शोषण हे दोन बाजूंनी होत असते. त्यामध्ये एक म्हणजे स्त्री म्हणून समाजामध्ये दुय्यम स्थान असते. त्यामुळे काही ठराविक गोष्टींपासून तिला जाणीवपूर्वक वंचित ठेवण्यात येते आणि दुसरे म्हणजे घरातून बाहेर काढल्यामुळे किंवा स्वतःहून घरातून बाहेर पडल्यामुळे तिला तिच्या हक्काच्या निवाऱ्यापासून वंचित रहावे लागते. त्यामुळे बेघर झालेल्या स्त्रियांचे समाजामध्ये मोठ्या प्रमाणात शोषण होते.

### बेघर स्त्रियांच्या समस्येची करणे

'बेघरपणा' या समस्येसाठी अनेक कारणे जबाबदार असल्याचे दिसून येते. परंतु या ठिकाणी स्त्रियांच्या बेघर होण्यामागील कारणांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. त्यासाठी जबाबदार असलेली कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

#### १) सामाजिक कारणे

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये पितृसत्ताक कुटुंब पद्धती अस्तित्वात असल्यामुळे समाजामध्ये पुरुषांचे वर्चस्व असलेले दिसून येते. त्यामुळे स्त्रियांचे समाजातील स्थान हे दुय्यम स्वरूपाचे असलेले दिसून येते. स्त्रियांना अनेक गोष्टींपासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले जाते. आजच्या प्रगत समाजामध्ये अनेक प्रकारची परिवर्तने होत असली तरीही समाजातील काही घटकांमध्ये अजूनही परिवर्तन झालेले दिसून येत नाही. त्यामुळे समाजामध्ये अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होत असलेले दिसून येत आहे. त्यामध्ये कौटुंबिक हिंसाचार ही समस्या आजही समाजामध्ये अस्तित्वात असलेली दिसत आहे. या समस्येमुळे समाजातील स्त्रियांचे बेघर होण्याचे प्रमाण वाढत असलेले दिसून येत आहे.



Scanned with OKEN Scanner

### २) आर्थिक कारणे

गरिबी आणि बेघरपणा या दोन परस्परसंबंधित समस्या आहेत. अचानक घराबाहेर पडल्यामुळे तसेच शिक्षणाचा अभाव असल्यामुळे 'बेघरपणा' या समस्येसोबतच 'गरिबी' या समस्येलाही बेघर लोकांना सामोरे जावे लागते. अचानक घराबाहेर पडल्यामुळे कोणत्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन उपलब्ध नसल्यामुळे त्यांना आपला उदरनिर्वाह करणे हे एक मोठे आव्हान असते. त्यामुळे बेघर स्त्रियांची आर्थिक स्थिती ही अत्यंत दयनीय स्वरुपाची असल्याचे समाजामध्ये दिसून येते. म्हणून बेघर लोकांना भीक मागून आपला उदरनिर्वाह करावा लागतो. त्याप्रमाणे ते आपला उदरनिर्वाह करण्याचा प्रयत्न करत असतात पण तरीही त्यांच्या या दयनीय स्थितीची दखल समजाकडून घेतली जात नाही उलट त्यांच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे बेघर स्त्रियांची समाजातील आर्थिक स्थिती ही अत्यंत हलाखीची असल्याचे दिसून येते.

### ३) शिक्षणाचा अभाव

भारतातील स्त्रियांना लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी भारतीय राज्यघटनेने काही हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये त्यांना शिक्षणाचा अधिकार देण्यात आलेला आहे. बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ मध्ये देण्यात आलेला आहे. त्यामध्ये ६ ते १४ वयोगटातील मुलींसह सर्व मुलांसाठी शिक्षण घेणे अनिवार्य आहे. त्याप्रमाणे स्त्रियांचे शिक्षणातील प्रमाण वाढलेले दिसत आहे. पण तरीदेखील काही ठिकाणी स्त्रिया या निरक्षर असल्याचे दिसून येते. त्यासाठी अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. त्यातील गरिबी हे महत्वाचे कारण असल्याचे दिसून येते. त्यामुळेच स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे तसेच कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे स्त्रियांचे बेघर होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच सुशिक्षित स्त्रिया देखील या समस्येला सामोरे जात असल्याचे दिसत आहे. त्यांची शैक्षणिक स्थिती ही जरी सुधारलेली असली तरीही समाजातील काही घटकांमुळे किंवा व्यक्ती-व्यक्तींच्या विचारातील भिन्नतेमुळे त्यांना त्यांच्या हक्काच्या घरापासून वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे त्यांना समाजातील मुख्य प्रवाहापासून वंचित रहावे लागत आहे. बेघर स्त्रियांची शैक्षणिक स्थिती ही खूप हलाखीची असल्याचे दिसून येत आहे.

### बेघर स्त्रियांच्या समस्येचे परिणाम

समाजव्यवस्था सुरळीत चालण्यासाठी समाजातील घटकांचे कार्य सुरळीत सुरु असणे गरजेचे असते पण त्यातील काही घटकांमध्ये बिघाड निर्माण झला तर त्यामध्ये अडथळे निर्माण होतात. त्यामुळे समाजामध्ये विघटनात्मक स्थिती निर्माण होते. त्याचे समाजावर वाईट परिणाम झालेले दिसून येतात. बेघर स्त्रियांच्या समस्येमुळे समाजावर अत्यंत वाईट परिणाम झालेले दिसतात. त्यामुळे कुटुंब संस्थेचे विघटन होते. त्याचबरोबर या एका समस्येमुळे समाजामध्ये अनेक समस्यांचा उगम नव्याने होत जातो. त्यामुळे त्याचे दुष्परिणाम समाजाला भोगावे लागतात.

### निष्कर्ष

समाजातील बेघर स्त्रियांच्या समस्येचे अध्ययन करत असताना असे दिसून आले की, समाजातील बेघर झालेल्या स्त्रियांना आपले जीवन जगत असताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. त्यांचे जीवन हे अत्यंत संघर्षमय असलेले दिसून आले. त्यासाठी शासनाने विविध योजनांची निर्मिती केली आहे. त्या योजनांची समाजामध्ये अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

### संदर्भ सूची


१) Ahuja, Ram. (2001). "Research Methods": Rawat Publications.

२) Dr. Salunkhe, S. (1996). "Basic Concepts in Sociology": Proficient Publishing House.




Scanned with OKEN Scanner